विवाहप्रसंगीचे प्रवचन

लेखक

सय्यद हामिद अली

गुलाम रसूल देशमुख

अनुवाद

सय्यद जाकिर अली

"अल्लाह, असीम कृपावंत व परम दयावंतच्या नावाने"

विवाहप्रसंगीचे प्रवचन

अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या सोबत्यांना आणि समस्त अनुयायांना निकाह अर्थात विवाहाप्रसंगी तसेच इतर महत्त्वाच्या प्रसंगी हे भाषण उद्धृत करण्याची शिकवण दिली आहे. या भाषणालाच इस्लामी परिभाषेत 'खुतबा-ए-निकाह' असे म्हणतात. म्हणून निकाह आणि इतर महत्त्वाच्या प्रसंगी या खुतब्याचे वाचन करावे म्हणजे हे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुकरण होईल. या भाषणाच्या माध्यमाने इस्लामच्या मौलिक शिकवणी आत्मसात करणेदेखील शक्य होईल. हा 'खुत्ब-ए-मसनूना' खालीलप्रमाणे आहे.....

अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दिलेल्या या प्रवचनाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात अंतिम पैगंबरांचे कथन असून त्याचा मराठीत अनुवाद देत आहोत...

"महिमा आणि कृतज्ञता अल्लाहसाठीच आहे. आम्ही त्याचे आभार मानतो. त्याच्यासमोर मदतीची याचना करतो, (झालेल्या चुका आणि अपराधांची त्याच्या दरबारी) क्षमा मागतो आणि आपल्या इच्छा अभिलाषांच्या तसेच वाईट कर्मांच्या वाईट परिणामापासून रक्षण होण्यासाठी त्याच्या अभयछत्राखाली येतो. तो ज्याला मार्ग दाखवील त्याला कोणीही मार्गभ्रष्ट करू शकत नाही आणि तो ज्याला मार्ग दाखविणार नाही, त्यास कोणीही मार्गदर्शन करू शकत नाही. मी साक्ष देतो की, अल्लाहशिवाय कोणीही पूजा अगर उपासनेस पात्र नाही आणि मुहम्मद (स.) त्याचे दास आणि पैगंबर आहेत."

यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कुरआनच्या चार आयतींचे पठण केले, त्याचा अनुवाद अशा प्रकारे आहे.

"लोकहो, आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगा ज्याने तुम्हाला एका जीवापासून निर्माण केले आणि त्याच जीवापासून त्याचे जोडपे बनविले आणि या एकाच जोडप्यापासून समस्त पुरुष व स्त्रिया जगात पसरविल्या. त्या अल्लाहचे भय बाळगा ज्याचा वास्ता देऊन तुम्ही एक दुसऱ्याकडून आपल्या हक्काची मागणी करता आणि नातेसंबंध विच्छेद करण्यापासून दूर रहा. खात्री बाळगा की अल्लाह तुम्हावर लक्ष ठेवून आहे." *(दिव्य कुरआन , ४ :१)*

"हे श्रद्धावंतांनो! अल्लाहचे भय बाळगा जसे भय बाळगले पाहिजे आणि तुम्हाला अशा अवस्थेत मृत्यू यावा की तुम्ही अल्लाहचे आज्ञाधारक असावे."

(दिव्य कुरआन , ३:१०२)

“हे श्रद्धावंतांनो! अल्लाहच्या कोपाचे भय बाळगा आणि सत्य व रास्त गोष्ट करीत जा. अल्लाह तुमचे आचरण सुधारील आणि तुमचे अपराध क्षमा करील. जो अल्लाह आणि त्याच्या पैगंबराच्या (स.) आज्ञांचे पालन करील, त्याला महान यश मिळेल.” *(दिव्य कुरआन , ३३:७०- ७१)*

प्रवचनाच्या दोन भागांचा हा अनुवाद आपण पाहिला. आता आपण याची व्याख्या समजून घेण्याचा प्रयत्न करू या.

प्रकरण - १

-सय्यद हामिद अली

आम्ही अल्लाहप्रति कृतज्ञता व्यक्त करतो

सत्यधर्म अर्थात इस्लामचा सर्वांत महत्त्वाचा आधार एका अल्लाहवर श्रद्धा ठेवणे होय. व्यक्ती असो की समाज, प्रत्येकाची सुधारणा होण्यासाठी अल्लाहशी खरा गाढ संबंध ठेवणे अत्यावश्यक आहे. याशिवाय व्यक्तीचे सुधारणात्मक प्रशिक्षण मिळणे व त्याचप्रमाणे समाजाची न्यायसंगत आणि वास्तविक उन्नती शक्यच नाही. अल्लाहवर श्रद्धा ठेवल्याशिवाय मानव आणि राष्ट्रांच्या परस्पर संबंधात सलोखा निर्माण होण्याची शक्यता नसते.

हे विश्व आणि समस्त मानवांचा निर्माणकर्ता अल्लाह आहे. तोच सर्वांचा पालनकर्ता, रक्षक आणि भाग्यविधाता आहे. आपल्याकडे असलेली प्रत्येक प्रकारची शक्ती, सामर्थ्य आणि पात्रता हे सर्वकाही त्यानेच प्रदान केलेले आहे. त्यानेच आपल्याला अस्तित्व प्रदान केलेले आहे. त्यानेच आपल्याला विचारशक्ती आणि भावना प्रदान केल्या, आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेल्या समस्त गरजांची पूर्तता केली. आपल्याला राहण्यासाठी पृथ्वी, श्वास घेण्यासाठी हवा, पिण्यासाठी आणि वापरण्यासाठी पाणी, अन्न जे आम्ही खातो, सूर्यापासून मिळणारी ऊर्जा आणि प्रकाश ज्याच्याशी जमिनीचे व मानवाच्या सर्व कर्मांचा संबंध आहे. मिळणाऱ्या त्या असंख्य सवलती, शक्ती, सामर्थ्य, विचारबुद्धी त्यानेच प्रदान केली. याच संशोधन आणि विचारशक्तीच्या जोरावर मानवाने वैज्ञानिक प्रगतीचा कळस गाठला आहे, चंद्रावर आणि ग्रहतारे तसेच अणुशक्ती व ऊर्जास्त्रोतांवर विकासाचा झेंडा रोवला आहे. समस्त भौतिक सुखसाधने अल्लाहनेच मानवास प्रदान केलेली आहेत. आपली पत्नी, मुले, आई-वडील, सासु-सासरे, नातलग, मित्रमंडळी, घरदार, व्यापार, उद्योग, संपत्ती वगैरे अल्लाहनेच प्रदान केलेले आहे. आपण अल्लाह कृपेवरच जगतो आहोत. त्याच्या अनुग्रहांची गणना करणेदेखील आपल्यासाठी अशक्य आहे. स्वत: अल्लाहने ही वस्तुस्थिती कुरआनात अशा शब्दांत मांडली आहे,

"जर तुम्ही अल्लाहच्या देणगीची गणना करू पहाल तर करू शकणार नाही."

(दिव्य कुरआन , १४:३४)

अल्लाहच्या या महान आणि अमर्याद उपकारांची फेड आम्ही मुळीच करु

शकत नाही आणि याकरिता त्याचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. म्हणूनच आपण तन-मन-धनासह त्याच्यासमोर नतमस्तक व्हावे. आपले मन त्याच्याप्रति प्रेमाने आणि कृतज्ञतेच्या भावनेने ओसंडून वाहवे, त्याच्या असीम उपकाराच्या जाणिवेने आपले मनमस्तिष्क त्याच्यासमोर वंदन करीत असावे. त्याचे नेहमी स्मरण करणारे आपले मुख आणि त्याचे महिमत्व व कृतज्ञतेने आपले जीवन त्याचे आज्ञापालक असावे आणि आपण त्याचे आज्ञाधारक व त्याच्या मर्जीवर प्राण देणारे सच्चे उपासक आणि आजीवन दास व्हावे.

'सूरह-ए-फातिहा' ही कुरआनची प्रारंभीची सूरह असून संपूर्ण कुरआनच्या शिकवणीचा सार आणि आत्मा समजले जाते. म्हणूनच ही सूरह नमाजच्या प्रत्येक रकअतमध्ये पठण करणे अनिवार्य ठरविले आहे. 'सूरह-ए-फातिहा'ची पहिली आयत 'अल हम्दु लिल्लाहि रब्बिल आलमीन' (अर्थात : स्तवन फक्त अल्लाहसाठीच आहे, जो समस्त सृष्टींचा रब (पालनकर्ता) आहे.) अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) हेदेखील आपल्या प्रत्येक भाषणाची व प्रवचनाची सुरुवात याच आयतीने करीत असत, म्हणजेच सर्वप्रथम अल्लाहाचे स्तवन करीत असत. हा या गोष्टीचा पुरावा आहे की, इस्लामचा सर्वांत मौलिक आणि भक्कम आधार अल्लाहची मनोभावाने कृतज्ञता व्यक्त करणे आणि आभार मानणे हेच होय. इस्लामी समुदायावर जगाचे नेतृत्व करण्याची आणि सत्याची साक्ष देण्याची जबाबदारी आल्यावर सर्वप्रथम ही मूलभूत शिकवण अशा शब्दांत अल्लाहने दिली,

''तुम्ही माझे स्मरण ठेवा, मी तुमची आठवण ठेवीन आणि माझ्याशी कृतज्ञ राहा, कृतघ्न होऊ नका.'' *(दिव्य कुरआन , २:१५२)*

साधारणतः माणूस हा सुख आणि भौतिक समाधानात तसेच चंगळवादात असल्यावर त्यास अल्लाहचा विसर पडतो. अहंकार आणि गर्वाच्या नशेत स्वतःच्या वास्तविकतेचा अर्थ हरवून बसतो. संपत्ती, सत्ता आणि सामर्थ्याच्या नशेत दीन-पददलितांवर अन्याय व अत्याचार करतो. इच्छा, आकांक्षा आणि स्वैर अभिलाषांच्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी निष्पाप मानवतेचा निर्घृण बळी देतो. तसेच लग्न समारंभ आणि आनंदाच्या प्रसंगी आपल्या प्रत्येक मित्र व नातलगास खूश करण्याचा आटापिटा करतो आणि अल्लाह व त्याच्या पैगंबर (स.) यांना हेतुपुरस्सर नाराज करतो. पैसा व्यर्थ खर्च करू नये, आपल्याकडे अल्लाहचाच ठेवा असलेल्या पैशांची वारेमाप उधळपट्टी करू नये आणि अल्लाहच्या आज्ञेचा भंग करता कामा नये. संपत्तीचे प्रदर्शन करण्यासाठी होणारी पैशांची उधळपट्टी करणे हे मुळात इस्लामी नियमाविरुद्ध आहे.

लग्न-समारंभाच्या प्रसंगी तर सैतान माणसाला तांडव करावयास लावतो आणि आपणही कोणताही सारासार विचार न करता पैशांची उधळपट्टी करीत असतो, हे मात्र इस्लामविरोधी कर्म होय, अपराध आणि गुन्हा होय. यामुळे आपण आपले जीवन आणि पारलौकिक जीवन आपल्याच हाताने उद्ध्वस्त करीत असतो.

असे का होत असते? कारण आपणास याप्रसंगी या गोष्टीचा पूर्णतः विसर पडलेला असतो की आपल्याला प्राप्त होणारा आनंद, सुख आणि यासारखा प्रत्येक अनुग्रह व यश हे केवळ अल्लाहकडूनच मिळत असते. आणि कधीही तो परत घेऊही शकतो. संतती आणि त्याचे सुखदेखील अल्लाहने दिल्यामुळेच आपल्याला मिळालेले असते आणि तो कधीही हे सुख आपल्याकडून हिरावून घेऊ शकतो. शिवाय एकवेळ तर अशी येईलच की समस्त सुख-समाधान एक-एक करून आपल्याकडून हिरावून घेण्यात येईल, म्हणूनच आपण ही सर्व सुखे पाहून आनंदाच्या भरात स्वतःची वास्तविकता विसरून जाता कामा नये, विवेकशक्ती हरवून बसता कामा नये. आनंद आणि सुख प्रदान करणाऱ्या आपल्या असीम दयाळू आणि कृपाळू अल्लाहसमोर तन-मन-धनाने शरण जावे, त्याची कृतज्ञता व्यक्त करावी, त्याचे स्तवन करावे, त्याचे आभार मानावे; अर्थातच त्याच्या आदेशाची पायमल्ली न करता त्याने दिलेल्या सुख-समाधान आणि संपत्तीचा त्याच्याच मर्जीनुसार वापर करावा. जर आम्ही असे केले तर अल्लाहवर उपकार करीत नाही तर आपलेच भले करील. या वर्तमान जीवनातही आपले भले होईल आणि महत्त्वाचे म्हणजे परोक्षात त्याच्या असीम कृपाफळांचा भोग घेता येईल. नाहीतर आपल्याला या जीवनात आणि परोक्षातही अल्लाहच्या प्रकोपाच्या असह्य यातना सहन करण्याची नामुष्की पत्करावी लागेल, हे विसरता कामा नये. कुरआनात हीच बाब अशा शब्दांत अधोरेखित करण्यात आली आहे,

"आणि स्मरण ठेवा, तुमच्या पालनकर्त्याने सावध केले होते की जर कृतज्ञ बनाल तर मी तुम्हाला आणखी जास्त उपकृत करीन आणि जर कृतघ्नता दर्शवाल तर माझी शिक्षा फारच कठोर आहे." *(दिव्य कुरआन , १४:७)*

आम्ही अल्लाहसमोर मदतीची याचना करतो.

अल्लाह आपला निर्माणकर्ता, स्वामी, प्रभू, पालनकर्ता, आम्हावर उपकार करणारा आणि पूज्य आहे. या सर्व संबंधाची निकड हीच आहे की, आम्ही नखशिखांत कृतज्ञ बनून आंतरबाह्य त्याचे दास बनून राहावे. त्याच्याप्रति आपले काही कर्तव्य असते. मात्र ज्यावेळी आपण अल्लाहस शरण जाण्याचा निश्चय करतो, तेव्हा आपला अहंकार व मन यामध्ये सर्वांत मोठी अडचण ठरतो. आपल्या स्वैर इच्छा, अभिलाषा आणि अत्यंत आकर्षक व विलोभणीय आणि स्वप्नरंजित वासनांचे एक जबरदस्त लष्कर सैतानाच्या प्रेरणेने आपल्या मार्गात अडसर बनते आणि सत्यमार्गात जीवनाची वाटचाल करणाऱ्यावर जबरदस्त हल्ले चढविते.

अर्थातच विवाहासारख्या अत्यंत आनंददायक प्रसंगी इच्छा-अभिलाषांच्या भावना अत्यंत तीव्र झालेल्या असतात आणि अशा प्रसंगी प्रत्येकास असे वाटते की याप्रसंगी आपण जिवांचे सर्व लाड पुरवावे, सर्व इच्छा व आकाक्षांची बिनधास्तपणे पूर्तता करावी. मग अल्लाह व पैगंबरांशी आदेशांची अशावेळी तो पायमल्ली करतो. भावना, इच्छा आणि स्वैर अभिलाषांचे सैतान मानगुटीवर बसलेले असते आणि माणूस इच्छा व स्वैर अभिलाषांच्या सुंदर, आकर्षक आणि विलोभणीय मोहपाशात अडकून अल्लाहशी असलेले निसर्गदत्त नाते तोडून टाकतो आणि मग हळू-हळू त्यास हा अतिसुंदर मोहपाश अल्लाहच्या आज्ञांना पायदळी तुडवित नरकाग्नीकडे घेऊन जात असतो. यदाकदाचित या सुंदर मोहपाशात अडकलेल्या व्यक्तीने कशीबशी स्वत:ची सुटका करून घेतलीच आणि परत सत्यमार्गाकडे वाटचाल केली तर आणखीन एक संकट त्याची वाटच पाहत असते आणि ते म्हणजे घर-परिवार, नातलग आणि मित्रमंडळी होय. स्वत:ची कशीबशी सुटका केली असली तरी यांच्या जिवाचे चोचले पुरविण्याच्या अगदी स्नेहपूर्ण मागण्या समोर आलेल्या असतात आणि याचे आव्हानसुद्धा स्वीकारून सतत लढा द्यावा लागत असतो. मग अशा दोन-दोन संकटांच्या कचाट्यात सापडणाऱ्याकडे अल्लाहसमोर रक्षण आणि अभयदानाच्या मदतीची याचना केल्याशिवाय इतर दुसरा कोणताही पर्याय शिल्लक नसतो. म्हणूनच प्रत्येक नमाजच्या प्रत्येक रकअतीमध्ये अल्लाहस शरण आलेला हा दास अल्लाहची मदत मागतो आणि त्याचा धावा करतो ते अशा शब्दांत,

"आम्ही तुझीच बंदगी (भक्ती) करतो आणि तुजपाशीच मदतीची याचना करतो."
(दिव्य कुरआन , १ : ४)

कारण याचकास हे चांगलेच ठाऊक असते की या समस्त विश्वावर केवळ अल्लाहचाच आदेश चालतो, प्रत्येक बाब त्याच्याच अखत्यारीत असून त्याच्याव्यतिरिक्त इतर कोणातही सामर्थ्य नाही. जीवन, मृत्यू, नफा, तोटा, मान-प्रतिष्ठा, अपमान, अप्रतिष्ठा, शासन, संपत्ती, उपजीविका, संतती, भाग्य, यश, अपयश, इहलोक, परलोक वगैरे सर्वकाही अल्लाहच्या हाती आहे. त्याच्याशिवाय इतराजवळ काहीच नाही. म्हणून त्याचा सच्चा भक्त केवळ त्याला प्रभू आणि स्वामी मानतो आणि त्याच्या कोपाची भीती बाळगतो व त्यावर पूर्ण भरवसा ठेवतो.

"ज्यांना लोकांनी सांगितले की, 'तुमच्याविरुद्ध मोठ्या फौजा गोळा झाल्या आहेत, त्यांची भीती बाळगा' तर हे ऐकून त्यांची श्रद्धा अधिक वृद्धिंगत झाली आणि ते उत्तरले की, "अल्लाह आमच्यासाठी पुरेसा आहे आणि तोच सवोत्कृष्ट कार्य सिद्धीस नेणारा आहे." *(दिव्य कुरआन , ३:१७३)*

अल्लाहचे हे गौरोवोद्गार त्याच्या कानात गुणगुणत राहतात,

"जो अल्लाहवर भिस्त ठेवील त्याच्यासाठी तो पुरेसा आहे."

(दिव्य कुरआन , ६५:३)

त्यास चांगलेच ठाऊक आहे की, तो अतिशय दुर्बल आणि सामर्थ्यहीन आहे. इच्छा-आकांक्षा आणि स्वैर अभिलाषांच्या मायाजालात अडकविण्याचा सर्वत्र प्रयत्न होत आहे. अशा परिस्थितीत ईशमार्गाकडे येण्यासाठी त्यास प्रचंड मोठ्या मदतीची गरज असते आणि संकटमय परिस्थितीत केवळ अल्लाहच त्याची मदत करू शकतो. त्याच्या मदतीशिवाय तो एक पाऊलसुद्धा उचलू शकत नाही. चोहोबाजुंनी घेरलेल्या संकटापासून आपला बचाव करण्यासाठी तो महान अल्लाहचा धावा करतो आणि अल्लाह त्याला आपल्या मदतीच्या छायेत अभय देतो. अशा स्थितीत तो निश्‍चिंत होतो की त्याला एकाच महान अस्तित्वाची (अल्लाह) मदत प्राप्त आहे आणि भक्ताच्या अंत:करणातून अल्लाहचे स्तवन करणारे शब्द नकळत बाहेर पडताती,

"अल्लाहु अकबर!!!"

अर्थात "अल्लाह महान आहे."

आम्ही अल्लाहच्या दरबारी आपल्या अपराधांची माफी मागतो.

अल्लाहचा सच्चा दास आणि श्रद्धावंत नेहमीच प्रयत्न करीत असतो की आपल्याकडून आपल्या स्वामी अल्लाहची अवज्ञा होऊ नये. मात्र शेवटी तो एक मानव असतो. त्याच्या स्वभावातच सत्यमार्गात असंख्य अडचणी निर्माण करणाऱ्या बाबी असतात. त्यातल्यात्यात तो स्वत: चुकीचा पुतळा असल्यामुळे कळत-नकळत त्याच्याकडून चुका घडत असतात. मात्र चुकीची जाणीव होताच त्याचा आत्मा थरथर कापायला लागतो. ईशअवज्ञेचे कारण दुष्परिणामाला तो जाणतो. त्यास ईशकोपाचा भयावह परिणाम माहीत असतो. त्याला आपल्याकडून झालेल्या चुकीचा खूप पश्चात्ताप होतो आणि यापुढे परत ही चूक घडू न देण्याचा पक्का निश्चय करतो. याप्रसंगी तो पश्चात्तापाने अल्लाहसमोर आपल्या अपराधाची गयावया करून क्षमा मागतो आणि परत अल्लाहशी आपले भक्तीसंबंध पूर्ववत जोडतो.

अल्लाहचा सच्चा आज्ञाधारक आणि आत्मसमर्पित माणूस अर्थात मुस्लिम आपले तन-मन-धन ईशमार्गात झोकून देतो आणि एवढे करूनही त्याला अल्लाहच्या दासत्वाच्या नात्याशी न्याय केल्याचे समाधान होत नाही. त्यास या गोष्टीची सतत जाणीव असते की अल्लाहने आपल्याला अस्तित्व देऊन आणि जगण्यासाठी सर्व सोयी करून आपल्यावर प्रचंड उपकार केले. आपले तन-मन-धन हे अल्लाहनेच आपल्याला प्रदान केलेले आहे. मग त्याच्या एका इशाऱ्यावर त्याने प्रदान केलेल्या या बाबी त्यालाच समर्पित केल्यास आपले काय बिघडणार? उलट याचा सर्वोच्च मोबदला आपल्याला मिळणार.

त्याला हे चांगलेच ठाऊक असते की, पैगंबर मुहम्मद (स.) एक निरपराध व्यक्तिमत्त्व असूनही ते अल्लाहच्या प्रत्येक आज्ञेचे तंतोतंत पालन करीत, त्याची भक्ती करीत आणि त्यांच्यासारखा भक्त इतर कोणीही नाही. तरीसुद्धा ते आपल्या स्वामी, प्रभू आणि उपास्य अल्लाहसमोर माफी व मुक्तीची प्रार्थना करताना अश्रु ढाळत असत.

आम्ही अल्लाहचा आश्रय मागतो.

'अल्लाहचा सच्चा दास नेहमीच अल्लाहच्या अभयछत्राची आशा बाळगतो. तो आपल्या अहंकार आणि स्वैर अभिलाषांच्या विलोभणीय बाहूपाशात अडकून पडण्याच्या कुपरिणामांची तीव्र जाणीव ठेवतो आणि त्याला याचीही जाणीव असते की, अल्लाह ज्याला सत्यमार्ग दाखवितो त्यास कोणीही मार्गभ्रष्ट करू शकत नाही आणि जर अल्लाहनेच एखाद्यास मार्गभ्रष्ट केले तर मग त्यास कोणीही सत्यमार्ग दाखवू शकत नाही'. हा मजकूर मुळात आज्ञाधारक दास अल्लाहचा आश्रय का घेतो हे दर्शवितो. अल्लाहने प्रदान केलेल्या अनुग्रहांपैकी सत्य मार्गदर्शन हा त्याचा सर्वांत महान अनुग्रह होय आणि याची माणसाला सर्वांत जास्त गरज आहे. कारण जर माणसाला सत्यमार्गाची ओळख नसेल तर तो सत्यमार्गावर चालू शकत नाही. यावर ईह आणि परलोकी जीवनाचे यश अवलंबून आहे. हे मार्गदर्शन अल्लाहने कुरआनच्या माध्यमाने मानवजातीस प्रदान केले आहे. म्हणून जे लोक पैगंबरांवर (अ.) ईमान धारण करतात आणि अल्लाहने प्रदान केलेल्या या मार्गाचा अवलंब करतात आणि ईशमार्गापासून रोखणाऱ्या दुष्ट प्रवृत्तीचा ईशमदतीच्या आधारे मुकाबला करतात, ते निश्चितच अल्लाहच्या अभयछत्रात येण्याची कामना करतात. ते सत्यमार्ग प्राप्त करतात आणि त्यावर चालून आपल्या पालनकर्त्याची भेट घेतील. याउलट ज्यांनी अल्लाहच्या अभयछत्राची कामना न करता जीवनाची वाटचाल केली, ते निश्चितच दुष्ट प्रवृत्तीच्या मोहपाशात अडकून आपले जीवन उद्‌ध्वस्त करतात. हे जाणून आज्ञाधारक दास स्वत:ला ईशहवाली करून टाकतो आणि शैतानाच्या व मनोकामनांच्या अरिष्टांपासून अल्लाहचा आश्रय मागतो.

एकेश्वरत्व आणि प्रेषित्वाची साक्ष

"मी साक्ष देतो की, अल्लाहशिवाय कोणीही पूज्य नाही आणि याचीही साक्ष देतो की, आदरणीय मुहम्मद (स.) अल्लाहचे दास आणि पैगंबर आहेत."

दोन प्रकारच्या साक्षीचे हे दोनच शब्द आहेत, मात्र यावर इस्लामची पूर्ण भव्य इमारत उभी आहे आणि यापासून त्या वृक्षाची निर्मिती होते, ज्यासंबंधी कुरआनात म्हटले आहे,

"अल्लाहच्या या कलिम्याचे (धर्मसूत्राचे) उदाहरण एका अत्यंत पवित्र वृक्षासम असून त्याचे मूळ अत्यंत मजबूत आणि त्याच्या फांद्या आसमंतात सर्वत्र विस्तारलेल्या आहेत. तो आपल्या पालनकर्त्याच्या कृपेने प्रत्येक क्षणी चांगली फळे देतो. अल्लाह या उदाहरणाच्या आधारे श्रद्धावंतांना वर्तमान आणि परलोकी जीवनात स्थैर्य प्रदान करतो."

याच कलिम्यासंदर्भात पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उघड आवाहन दिले आहे,

"लोकहो या कलिम्याचा स्वीकार करा. अरब आणि बिगरअरबांचे पूर्ण नेतृत्व तुमच्या हाती येईल."

आणि इतिहास साक्षी आहे की ज्यांनी या धर्मसूत्राचा स्वीकार केला, ते समस्त जगाचे शासक बनले. अल्पसंख्येत असूनही रोम आणि पर्शियासारख्या साम्राज्यांना गुलामी पत्करावी लागली. कारण या धर्मसूत्राचा चमत्कारच असा आहे की माणूस समस्त प्रकारची गुलामगिरी झुगारून देतो आणि एकाच अल्लाहची गुलामी स्वीकारतो. या धर्मसूत्रामागे एकमेव अल्लाहची प्रचंड शक्ती असून जगात यामुळे अद्वितीय क्रांती घडली. म्हणूनच हा कलिमा प्रत्येकाच्या मानसिकतेत रूजावयास हवा. यासाठीच मूल जन्मताच त्याच्या कानात हे शब्द उच्चारून त्यास याचे बाळकडू पाजण्यात येते. प्रत्येक नमाजीत याच विचारधारेचे स्मरण करून देण्यात येते आणि प्रत्येक भाषणात आणि लग्न प्रवचनात याची साक्ष देण्यात येते. हे यासाठी की, आम्हाला सतत स्मरण राहावे की आम्ही प्रत्येक ठिकाणी व प्रत्येक वेळी अल्लाहचे दास आहोत आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुयायी आहोत.

ईशभय आणि आज्ञापालन

यानंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कुरआनच्या चार आयती पठण केल्या. या चारही आयतीत अशी शिकवण आहे,

“अल्लाहचे भय बाळगा आणि त्याची अवज्ञा करू नका.” अर्थात अल्लाहचे भय हे जीवनाच्या म्हणजे इहलोकी आणि परलोकी जीवनाच्या यशाची गुरुकिल्ली आहे. म्हणून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी वारंवार याचे स्मरण करून दिले आणि प्रामुख्याने लग्नसमारंभाच्या आनंदाच्या प्रसंगी. माणूस आनंदाच्या भरात अल्लाहची अवज्ञा करण्याची जास्त शक्यता असते. वस्तुस्थिती अशी आहे की माणूस हा अल्लाहच्या तुलनेत शून्य आहे. तो अन्न-पाणी आणि एकेका श्वासासाठी अल्लाहवरच अवलंबून आहे. मात्र संपत्ती आणि सामर्थ्याच्या झिंगेत त्याला अल्लाहचा विसर पडतो आणि कधी-कधी तर संपत्ती आणि सामर्थ्य नसतानादेखील तो आपला विवेक हरवून बसतो. वाटेल ते करीत राहतो. आपल्या इच्छा-आकांक्षाची पूर्तता करताना अल्लाहच्या आज्ञांची पायमल्ली करीत जातो. मात्र एक दिवस असा येतो की त्याचे सर्वकाही नष्ट होते. त्याची संपत्ती आणि सामर्थ्य त्याच्याकडून हिरावून घेण्यात येते. याच दुष्प्रवृत्तीमुळे मोठमोठी राष्ट्रे नष्ट पावली. मनुष्य हा मुळात अतिशय दुर्बल आणि परावलंबी आहे. तो आत्मबळावर काहीही करू शकत नाही. त्याने अल्लाहस शरण राहूनच जगावयास हवे. त्याचे दास्यत्व पत्करून आणि त्याच्या अभयछत्रात राहून जगावयास हवे. एके दिवशी समस्त मानवांना त्याच्या न्यायालयात हजर होऊन आपल्या कर्मांचा जाब द्यावा लागणार आहे. अल्लाहच्या आज्ञांचे पालन करून जीवन जगणाऱ्यांसाठी निश्चितच स्वर्गाची प्राप्ती होईल आणि अवज्ञाकारीसाठी भयावह नरकाग्नीच्या उग्र ज्वाला पेटविण्यात आलेल्या आहेत. धन्य ते लोक ज्यांनी ईशपरायणशील व आज्ञाधारकतेने जीवन व्यतित केले आणि सुखदुःखाच्या कोणत्याही स्थितीत त्याना आपल्या कामगिरींचा जाब अल्लाहला धावा लागेल याचा विसर पडत नाही.

मानव आणि नातलगांचे हक्क पूर्ण करावे.

धर्मपरायणता आणि ईशभयच्या शिकवणी-व्यतिरिक्त वर पठण करण्यात आलेल्या आयतीमध्ये मानवांचे आणि नातलगांचे हक्क पूर्ण करण्याची विशेष शिकवण देण्यात आली आहे. समस्त मानवांना अल्लाहने निर्माण केले आहे. सर्व मानव हे एकाच माता-पित्याची संतती असल्याने आपण समस्त मानव एकाच परिवाराचे सदस्य आहोत. आपसांत बंधु आणि नातलग आहोत. म्हणून प्रत्येकाचे एकमेकांवर हक्क आहेत. हे हक्क पूर्ण करणे नितांत आवश्यक आहे. जसी अल्लाहची दासत्व हदीसद्वारा माहीत होते अल्लाह कुफ्र व शिर्कशिवाय अल्लाहस वाटल्यास इतर अपराधांची माफी देईल, मात्र मानवी हक्कांची पायमल्ली मुळीच खपवून घेणार नाही व माफ करणार नाही जोपर्यंत मनुष्य स्वत: माफ करत नाही.

विवाहप्रसंगी मानवाधिकार आणि नातलगांचे अधिकार पूर्ण करण्याची शिकवण अत्यंत महत्त्वपूर्ण असून नववधू आणि वराच्या नातलग व याप्रसंगी हजर असलेल्या लोकांसाठी अमूल्य भेट आहे. पतीने पत्नीचे हक्क पूर्ण केल्यास, मुलांनी मात्यापित्यांचे, मातापित्यांनी मुलांचे आणि नातलगांनी एकदुसऱ्यांचे आणि शेजाऱ्यांने शेजाऱ्याचे तसेच प्रत्येकाने दुसऱ्याचे हक्क जर पूर्ण केले तर या भूतलावर स्वर्गरूपी नंदनवन बहरेल.

या आयतीवरून हे स्पष्ट होते की सर्व मानव एकाच माता-पित्याची संतती असून सर्वजण एकाच परिवार आणि एकाच वंशाचे सदस्य आहेत. म्हणून वर्ण आणि वंश तसेच जाती-पातीच्या आधारे कोणीही श्रेष्ठ आणि कनिष्ठ नाही. त्या आधारावर वरिष्ठ-कनिष्ठ आणि उच्च-नीच भेदभाव इस्लामने नष्ट केला आहे.

इस्लामखातर प्राणाची बाजी लावावी.

उपरोक्त दुसऱ्या आयतीमधील पहिल्या भागात धर्मपरायणता व ईशभयाची विशेष शिकवण देण्यात आली. धर्मपरायणतेचा हक्क असा की, अल्लाहचे आज्ञापालन करीत आपल्या जीवनाची वाटचाल करावी आणि अगदी अंतिम श्वासापर्यंत याच पद्धतीने जीवन व्यतीत करावे.

अर्थात आपण इस्लामकरिता जीवन समर्पित करावे. व्यक्तिगत व सामूहिक जीवनात, घरात किंवा घराबाहेर, हवेतील किंवा पाण्यावरील प्रवासात प्रत्येक ठिकाणी व प्रत्येक वेळेस आम्ही अल्लाहचे सच्चे दास व पैगंबर मुहम्मद (स.) याचे अनुयायी आहोत. जोवर शक्य आहे आपल्या सर्व पात्रता अल्लाहच्या दासत्वासाठी समर्पित कराव्यात आयतच्या दुसऱ्या भागात ईशआज्ञाधारकतेची नीती जीवनाच्या शेवटापर्यंत कायम राहावी. मृत्यूदूत जेव्हा कधी येईल तेव्हा आम्हाला त्याने धर्मपरायण व ईशपरायणशील पाहावे आणि आम्ही आपल्या पालनकर्त्याचे दासत्व करत करत त्याच्यासमोर हजर व्हावे. याचा अर्थ हासुद्धा आहे की जेव्हा इस्लाम आणि प्राण यापैकी एक निवडण्याचा प्रसंग आल्यास डोळे झाकून इस्लामची निवड करावी. शाश्वत प्रकोप व शिक्षेला कारणीभूत कुफ्र (द्रोह) व विरोधकाच्या स्थितीत मरण आहे आणि त्या मरणापेक्षा श्रेष्ठ मरण दुसरे नाही जे अल्लाहसाठी आणि अल्लाहच्या मार्गात येते. शहीद मरताक्षणी जन्नत प्राप्त करतो. शहादत श्रद्धावंतांचे जीवन ध्येय आहे. शहादाची (वीरमरणाची) तर अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांची सुद्धा कामना होती.

नेहमी सत्य बोला

तिसऱ्या आयतीमध्ये ईशभय आणि धर्मपरायणतेबरोबरच एक अत्यंत महत्त्वपूर्ण शिकवण देण्यात आली आहे, "(नेहमी) सत्य बोला." हृदयानंतर सर्वांत महत्त्वाचा अवयव जीभ आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले, "कर्मांची भिस्त कशावर आहे?" नंतर पैगंबर (स.) यांनी आपली जीभ पकडून सांगितले, "याला आपल्या काबूत ठेवा." (हदीस : तिर्मिजी, इब्नेमाजा, मुसनद अहमद)

आणखी एके ठिकाणी म्हटले,

"जी व्यक्ती मला मुख आणि गुप्तांगाच्या (वाईट बोलण्यापासून आणि व्यभिचारी कर्मांपासून) संरक्षणाची हमी देईल, त्यास मी स्वर्ग-प्रवेशाची हमी देतो."

(हदीस : तिर्मिजी, इब्ने माजा, मुसनद अहमद)

आणखी एके प्रसंगी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे,

"जी व्यक्ती अल्लाहवर आणि अंतिम निवाड्याच्या दिवसावर श्रद्धा ठेवते, तिने फक्त सत्यच बोलावे अन्यथा गप्प बसावे." (हदीस : बुखारी, मुस्लिम)

वास्तविकता अशी आहे की, अल्लाहच्या आणि मानवाच्या हक्कांची जितकी अधिक पायमल्ली मुखावाटे होते, अन्य अवयवाद्वारे क्वचितच होते आणि कधी कधी मनुष्याला याचे ज्ञान नसते. भांडण-तंट्याची सुरवात जिभेनेच होते. जेव्हा आम्ही कमी बोलू, विचारांति बोलू, अपराधात्मक बोलणार नाही आणि तोंडाद्वारा इतराना दु:ख देणार नाही आणि नेहमी भले व सत्य बोलू तेव्हाच घरातील व बाहेरील जीवन आनंददायी बनेल.

पारलौकिक यश

अल्लाह आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मार्गदर्शनानुसार जीवन जगण्यानेच पारलौकिक यश मिळेल. उपरोक्त आयतीत चौथी महत्त्वपूर्ण असलेली गोष्ट अशी, "जो कोणी अल्लाह व पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आज्ञापालन करील त्याला महान यश प्राप्त होईल." हे खंदकच्या युद्धानंतर त्वरित सांगितले गेले होते. जेव्हा पूर्ण अरब देश मदीनासारख्या लहानशा वस्तीला नष्ट करण्यासाठी आतुर होता. ही फक्त अल्लाहचीच कृपा होती की ती खतरनाक मोहिम असफल ठरली. जगाने उघड्या डोळ्यांनी पाहिले की, मुस्लिम पूर्ण अरब देशावर दोन तीन वर्षातच प्रभुत्वशाली बनले. मुस्लिमांनी अरब देशापासून सभ्य जगाच्या मोठ्या क्षेत्रावर इस्लामचा ध्वज फडकाविला. त्याकाळातील जगातील दोन "सुपर पावर" इराण आणि रोम साम्राज्य मुस्लिमांना नष्ट करू पाहात होत, परंतु ते असे करण्यास विवश ठरले. मुस्लिम जगाला मार्गदर्शन करणारा समुदाय बनले. त्यांना अशी सफलता मिळाली की मानवी इतिहासात कुणालाही प्राप्त झाली नाही. ही तर जगाची सफलता होती आणि शाश्वत पारलौकिक सफलता तर प्रत्येक सच्च्या मुस्लिमासाठीच आहे.

लग्नासारख्या बाबीविषयी विचार करावयाचा झाल्यास याप्रसंगीसुद्धा इस्लामी पद्धती आणि नियमांचे पालन करण्यातच यश आहे, एवढे मात्र निश्चित. आम्ही अनेकानेक बंधन व परंपरांमध्ये स्वत:ला जखडून घेतले आहे. लग्न कार्य अत्यंत महाग व अशक्य गोष्ट बनली आहे. इस्लामने लग्न (निकाह) साधे सरळ व कमी खर्चाचे बनविले आहे. आम्ही जर इस्लामी शिकवणीवर कायम राहिलो आणि त्यानुसार आचरण केले तर साधे जीवन, आनंददायी जीवन आणि सफल जीवनप्राप्ती निश्चित

प्रकरण - २

-गुलाम रसूल देशमुख

विवाहाचे मूलभूत नियम

इस्लाम मूलत: अल्लाहच्या परिपूर्ण आज्ञापालनाचे दुसरे नाव असून इस्लामी शरीअतचा उद्देश मानवकल्याण आणि त्याची सर्वांगीण भलाई होय. इस्लाम जीवनाशी निगडीत सर्व कार्यविधी आणि समस्यांविषयी मार्गदर्शन करून मनुष्याला शरीअतच्या अधीन बनवू इच्छितो. प्रस्तुत निबंधात लग्न-विवाहाच्या प्रश्नावर प्रकाश टाकण्यात आला आहे, ज्या अन्वये इस्लामबाह्य आणि अडाणीपणाचे रितीरिवाज व रूढींपासून मुस्लिम सुरक्षित राहील.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा उपदेश

निवडीचे निकष

विवाहकार्यात नात्यागोत्यांची सुयोग्य निवड अतिशय महत्त्वपूर्ण असून याबाबतीत शरीअतचे मौलिक मार्गदर्शन नि:संशय अत्यंत उद्‌बोधक ठरणार आहे.

* ''पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सुवचन आहे, स्त्रियांशी चार गोष्टींच्या दृष्टीतून 'निकाह' केला जातो. तिच्याकडील- (१) मालमत्तेच्या दृष्टीतून, (२) वंश, घराणे व परिवाराच्या कारणामुळे, (३) अप्रतिम सौंदर्यामुळे आणि (४) धार्मिकतेच्या (चारित्र्य संपन्नता) सबबीमुळे. तुम्ही धर्मपरायणतेला (चारित्र्यसंपन्नता) प्राधान्य द्या.'' (हदीस : बुखारी)
* अन्यस्थानी प्रतिपादीत करण्यात आले आहे- ''तुम्ही त्यांच्याशी विशेषत: धर्माच्या आधारावर विवाह करावा. कारण एक काळीकुट्ट अडाणी दासीसुद्धा जर धर्मपरायण (चारित्र्यसंपन्न) असेल तर ती अन्य स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ आहे.'' (हदीस)
* अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांच्या निवेदनानुसार पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''सदाचारी व सत्शील पत्नी अल्लाहची श्रेष्ठतम कृपा आहे.''

  (हदीस : मुस्लिम)
* खरेतर जीवनाविषयीचे वास्तविक ज्ञान आणि त्यानुसार आचरण खूप मोठी संपत्ती असून जीवन आनंददायी, समाधानी बनविण्यासाठी व मन:शांतीसाठी हे

अत्यावश्यक आहे.

विवाहाचे (निकाहचे) महत्त्व

* माननीय अय्यूब (र.) यांच्यकडून निवेदन करण्यात आले आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''ज्या व्यक्तीने माझ्या जीवनशैलीचे अनुसरण केले तो माझा आहे. आणि माझ्या आदर्श कार्यप्रणालीचे (सुन्नतचे) अनुकरण 'निकाह' आहे.''

(हदीस)

त्वरा करा

* ''पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्मावले, ''हे अली (रजि.) तीन कामे अशी आहेत ज्यासाठी त्वरा (घाई) केली पाहिजे एक नमाज जेंव्हा तिची वेळ येईल. दुसरे प्रेत ज्यावेळी ते तयार होईल. तिसरे अविवाहित स्त्रीचा निकाह, जेव्हा तिला योग्य स्थळ प्राप्त होईल.'' (हदीस : तिर्मिजी)

नातेसंबंध ठरविण्याच्या प्रक्रियेस वाड़निश्चय म्हणतात. परंतु स्थळ ठरल्यापश्चात अडाणीपणाच्या इस्लामबाह्य रितीरिवाजांचे असे दुष्टचक्र सुरू होते. की रूढी परंपरांच्या पालनात लोक सैतानालादेखील लाजवतात. वास्तविकपणे ईमानधारकांना उपरनिर्दीष्ट शिकवणींनुसार इस्लामी आदेशांचे पालन करीत अनिष्ट रिती-रिवाजांचा संपूर्णत: अव्हेर केला पाहिजे.

महर

निकाहमध्ये महरचे स्थान 'फर्ज' अर्थात अनिवार्यतेचे आहे. शरीअतने 'महर'ला स्त्रियांचा अनिवार्य अधिकार ठरवून वैवाहिक जीवनाचे महत्त्व, मूल्य व सन्मान वृद्धिंगत करून निकाह एक पवित्र आणि अत्यावश्यक कार्य असल्याची जाणीव करून दिली आहे.

अल्लाहचा आदेश

* ''स्त्रियांचे महर प्रसन्न अंत:करणाने व कर्तव्य म्हणून अदा करा.''

(दिव्य कुरआन, ४:४)

निकाहच्या वेळी जो महर निर्धारित करण्यात आला असेल त्याची अदायगी पुरुषावर बंधनकारक आहे. त्यास निकाह प्रसंगीच अदा करायला हवे. यालाच

शरीअतच्या भाषेत 'मुअज्जल' (शिघ्रतेने) म्हटले जाते. अर्थात ते रोख स्वरूपात त्वरीत देऊन टाकावे. जर पुरुष अशा अवस्थेत नसेल की ताबडतोब अदा करील अशा समयी ही बाब ठरविली पाहिजे की ते केंव्हा, कसे आणि कशाप्रकारे अदा होईल. त्याचे स्वरूप मागणी करताच द्यावयाचे आहे. यास शरीयत भाषेत 'मुवज्जल' (उधार) म्हणतात.

* ''पैगंबर मुहम्मद (स.) यांचे प्रतिपादन आहे, स्त्रियांना पुरुषांच्या पदरी बांधण्याचा यत्न करावा आणि महरच्या बाबतीत मर्यादेचे उल्लंघन करू नये.''

सारांश 'महर' पुरुषांच्या क्षमता व ऐपतीप्रमाणे असला पाहिजे. केवळ नावलौकिकाच्या हेतूने मोठमोठ्या रक्कमा निश्चित केल्या जातात. मात्र अदायगीच्या बाबतीत बोंबाबोंब. त्या जर रोखीने अदा केल्या तर उत्तम होय. जर इरादाच महर देण्याचा नसेल तेंव्हा अशा स्वरूपात पुरूष अपराधी ठरतो.

महरसंबंधी अल्लाह आणि त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी कोणतीही अंतिम मर्यादा निश्चित केलेली नाही. माननीय उमर (रजि.) आपल्या शासनकाळात ४० अवकीया चांदी (सुमारे ४५० तोळे चांदी) ठरवू इच्छित होते. यापेक्षा अधिक कोणी महर ठरवू नये. परंतु या सभेत एका महिलेने माननीय उमर (रजि.) यांना प्रतिरोध केला आणि सांगितले की अल्लाहच्या शिकवणीविरुद्ध निर्णय घेण्याचा आपणास कोणी हा अधिकार प्रदान केला आहे? ज्याअर्थी अल्लाहचे फर्मान आहे,

* ''जर स्त्रियांना तुम्ही ढीगभर माल दिला असेल तर त्यातून काही माघारी घेऊ नका.'' *(दिव्य कुरआन, ४:२०)*

हा विचार ऐकून माननीय उमर (रजि.) म्हणाले, ''एका स्त्रीने सत्य गोष्ट प्रतिपादन केली आहे आणि पुरुष मात्र प्रमाद (चूक) करून बसला.''

वास्तविक शरीअतने लोकांना अतिरेक करण्यापासून प्रतिबंध घातला आहे. महर वराच्या ऐपतीपेक्षा कमी नसावा आणि इतका जास्तसुद्धा नसावा की अदायगी करणे दुरापास्त नव्हे तर अशक्य ठरेल.

मदीनेच्या इस्लामी समाजात अशा प्रकारची बरीच उदाहरणे दृष्टीस पडतात. ज्यात महर म्हणून खजूराचे मळेदेखील देण्यात आले होते. इथे विस्ताराच्या भयास्तव फक्त दोन उदाहरणे देण्यात समाधान मानतो.

(१) पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याजवळ एक अबला जमीला बिन्त उबई आली

आणि स्वतःच्या पतिविषयी तक्रार करीत म्हणाली, 'मी विभक्त होऊ इच्छिते.' पैगंबरांनी तिचे गाऱ्हाणे ऐकले आणि सांगितले, 'जी बाग त्याने तुला दिली होती ती परत करून टाकशील का?' त्या स्त्रीने लगेच होकारार्थी उत्तर दिले, 'होय! अल्लाहच्या पैगंबरा.'

(२) दुसरे उदाहरण हबीबा बिन्त सहल (रजि.) यांचे आहे. जेव्हा महिलेने तिच्या पतीबद्दल तक्रार करताना म्हटले, 'त्याने जो माल मला दिला होता तो मी परत करते, मला विभक्ती मिळवून द्यावी.'

कित्येक घटना अशादेखील आहेत की पुरुष महरच्या स्वरूपात काही देण्याचे सामर्थ्य बाळगत नव्हते. अशा वेळी महर स्वतःच्या धर्मपत्नींना कुरआनचे धडे गिरवणे हा ठरविला गेला होता.

महरसंबंधी जर पुरुषाचा बेत असा असेल की तो अदा करावयाचा नसेल तर प्रेषितांच्या म्हणण्यानुसार तो निकाह वैध ठरणार नाही.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे उपदेश

* ''ज्याने एखाद्या स्त्रीशी निकाह केला आणि निश्चय केला की तो महर देणार नाही तर व्यभिचारी ठरेल.'' (हदीस)
* ''ज्याने विशिष्ट रक्कम महरच्या मोबदल्यात एखाद्या स्त्रीसोबत निकाह केला आणि असे ठरवले तो महर अदा करणार नाही. तो वास्तविकतः व्यभिचारी व बलात्कारी आहे आणि ज्याने कर्ज घेतले आणि निर्धार केला हे कर्ज मी फेडणार नाही मग तो खरोखरच चोर आहे.'' (हदीस)

उपरलिखित हदीसींच्या प्रकाशात शरीअतमध्ये महरचे असाधारण महत्त्व, स्थान आणि त्याची गरज याचा अंदाज येतो. तसेच अदा न करण्यामुळे होणाऱ्या परिणामाचा निष्कर्षसुद्धा माहीत होतो.

विवाहोत्तर भोजन (तआमे 'वलिमा')

वलिमाचे भोजन पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुसरण अर्थात सुन्नत असून ते निकाह झाल्यानंतर दिले जाते. पैगंबरांनी त्यांच्या सर्व निकाह पश्चात 'वलिमा' दिला आहे. मग त्याचे प्रमाण अल्प असो वा अधिक. परंतु त्यावर आचरण झाले पाहिजे.

* ''माननीय अबू हुरैरा (रजि.) यांचे निवेदन आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''निकृष्ठ भोजन त्या वलिमाचे आहे ज्यात श्रीमंतांना आमंत्रित केले जाते व गरीबांना हेतुपुरस्सर डावलले जाते.'' (हदीस : बुखारी, मुस्लिम)

सर्वसाधारणपणे अडाणीपणाच्या रिवाजानुसार, विवाहपूर्वीच वरपक्षाकडून भोजनाची व्यवस्था केली जाते. मात्र विवाहोत्तर वलिमा करण्याचे टाळले जाते. ते चुकीचे आणि शरीअतविरोधी तसेच सुन्नत (वलिमाच्या) विरूद्ध कृत्य आहे.

एक अडाणीपणाची रुढी

काही ठिकाणी असे निदर्शनास येते की, विवाह मंडपात भोजनस्थळी टेबल थाटले जाते. हेतू असा की, लोकांनी भोजन आटोपल्यावर काही रक्कम तिथे जमा करावी हासुद्धा निर्लज्जपणाचा कळस नव्हे का? विवाह सोहळ्यात लोकांना जेवणासाठी निमंत्रित केले जाते आणि त्यांच्याकडून एक विशिष्ट रक्कम भोजनाचे बील (आहेर) म्हणून वसूल करण्यात येते.

बेपर्दगी

विवाहप्रसंगी बेपर्दगी आणि विवस्त्रपणाचे हिडीस दर्शन पाहावयास मिळते. यावरून सकृतदर्शनी असे वाटू लागते की, स्त्रिया त्यांच्या सौंदर्याचे जाहीर प्रदर्शन घडविण्यासाठीच आतूर होऊन एकत्रित झाल्या आहेत. हे अगदी स्पष्ट आहे की विवाहासारख्या कार्यक्रमात गोशा, पर्दा अनिवार्य आहे. त्याविरूद्ध वर्तन मोठा अपराध आहे.

कुरआनचे फर्मान

* ''आणि हे पैगंबर (स.), श्रद्धावंत स्त्रियांना सांगा की, त्यांनी आपल्या दृष्टींची जपणूक करावी आणि आपल्या लज्जास्थानांचे रक्षण करावे. आणि आपला साजशृंगार दर्शवू नये त्याव्यतिरिक्त जे सहजासहजी प्रकट होईल आणि आपल्या छातीवर आपल्या ओढणीचा पदर घालून ठेवावा. त्यांनी आपला साजशृंगार प्रकट करू नये परंतु या लोकांसमोर, पती, पिता, पतीचे वडील, आपली मुले, पतीची मुले, भाऊ, भावांची मुले, बहिणींची मुले आपल्या मेलमिलाफाच्या स्त्रिया, आपल्या दासी, गुलाम,

ते हाताखालचे पुरुष जे एखादा अन्य प्रकारचा हेतू बाळगत नसतील आणि ती मुले जी स्त्रियांच्या गुप्त गोष्टींशी अद्याप परिचित झाली नसतील त्यांनी आपले पाय जमिनीवर आपटत चालू नये की जेणेकरून त्यांनी जो आपला शृंगार लपविलेला आहे त्याचे ज्ञान लोकांना होईल.''

(दिव्य कुरआन, २४– ३१)

स्त्रियांचे (सतर) पोशाखाचे नियम

स्त्रियांच्या पोशाखाच्या (सतरच्या) नियमांतर्गत मर्यादा आहेत. त्यांनी आपले चेहरे आणि हातांव्यतिरिक्त संपूर्ण शरीरास पतिशिवाय समस्त लोकांपासून लपवावे, कारण स्त्रियांसाठी हे अवयव लज्जास्थळाचे स्थान बाळगतात.

* ''पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्माविले, अल्लाह आणि मरणोत्तर जीवनाच्या दिवसावर ईमान व श्रद्धा बाळगणाऱ्या एखाद्या महिलेस वैध नाही की तिने स्वत:चा हात यापेक्षा जास्त उघडा ठेवावा, असे प्रतिपादन करून पैगंबरांनी आपल्या कराच्या निम्म्या भागावर स्वत:चा हात ठेवला.'' (हदीस)

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे उपदेश

* ''जेव्हा स्त्री प्रौढावस्थेत येईल अशा वेळी तिच्या शरीराचा कोणताही भाग दृष्टीस पडता कामा नये, फक्त चेहरा आणि मनगटाच्या पुढील हात.''

  (हदीस : अबू दाऊद)

* ''पैगंबर मुहम्मद स. यांचे विधान आहे की, अल्लाह धिक्कार करतो अशा स्त्रियांचा ज्या पोशाख परिधान करूनदेखील नग्न राहतात.

* ''माननीय उमर (रजि.) यांनी म्हटले आहे, तुमच्या स्त्रियांना असे वस्त्र परिधान करण्यास कदापि भाग पाडू नका जे शरीरावर घट्ट बसतील. ज्याअन्वये संपूर्ण अंगाचे दर्शन घडत असेल.''

उपरलिखित शिकवणींच्या उजेडात स्त्रियांनी गोशापासून परावृत्त होण्याचा मोह अवश्य टाळला पाहिजे .

वारसाहक्कात कन्येचा अधिकार

पवित्र कुरआनात उल्लेखित आहे की वारसा हक्कात कन्येचा अधिकार पुरुषाच्या तुलनेत निम्मा आहे.

अल्लाहचा आदेश

* *''तुमच्या संततीच्या बाबतीत अल्लाह तुम्हास मार्गदर्शन करतो की, पुरुषाचा वाटा दोन स्त्रियांच्या समान आहे.''* *(दिव्य कुरआन, ४:११)*

* परंतु जे लोक कन्येचा हिस्सा काढत नाहीत त्यांच्याविषयी फर्माविले,

''आणि जे अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांची अवज्ञा करतील आणि निर्धारित मर्यादेचे उल्लंघन करतील त्यांना अल्लाह नरकाग्नीत टाकील. ज्यात ते सदैव राहतील आणि त्यांच्यासाठी निराशाजनक शिक्षा आहे.'' *(दिव्य कुरआन, ४:१४)*

* अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी फर्मावले, ''जो आपल्या वारसांना वारसा हक्कापासून वंचित करील त्याला कियामतच्या (जगाच्या प्रलयाच्या दिवशी) दिनी अल्लाह स्वर्गापासून वंचित ठेवील.'' (हदीस : इब्ने माजा)

या शिकवणीनुसार दिव्य कुरआनात निर्धारित केलेला वारसाहक्कातील वाटा अदा केला पाहिजे जेणेकरून तो अल्लाहच्या प्रकोपापासून सुरक्षित राहू शकेल.

(स्पष्ट व्हावे की, इथे केवळ कन्येचा वारसा हक्कातील वाट्याचा उल्लेख केला जात आहे. संपूर्ण वारसाहक्कांचा तपशिल हा यावेळी आमचा विषय नाही.)

भेटवस्तू

भेटवस्तू देणे शरीअतमध्ये अत्यंत प्रिय बाब आहे. परंतु परतफेड आणि मोबदल्याची आंतरिक इच्छा नसावी. सदरहु गोष्ट इस्लामी शरीअतच्या अगदी विरूद्ध असून एखाद्या व्यक्तीने दुसऱ्याला एखादी वस्तू भेट म्हणून दिल्यानंतर त्याच्याकडून तशाच प्रकारे परतीची अपेक्षा बाळगावी या हीन कृत्यास हदीसमध्ये त्या कुत्र्याची उपमा देण्यात आली आहे, जो स्वत:च्या वांतीस (ओकारी) स्वत: चाटून घेतो.

अल्लाहजवळ प्रार्थना आहे की, ईमानधारकांना अल्लाहचे आज्ञापालन तद्वत 'शरीअत–ए–इस्लामी' चा पाईक होण्याची सुबुद्धी प्रदान करो.

- समाप्त -